**CNR No.MHLA090018942023**

## निशाणी ५ खालील आदेश

वादीने प्रस्तुतचा अर्ज आदेश ३९ नियम १ व २ दिवाणी प्रक्रिया संहिता प्रमाणे तुर्तातुर्त मनाई हुकूम मिळणेसाठी दाखल केला आहे.

२. **वादीच्या प्रस्तुत अर्जातील थोडक्यात कथन खालीलप्रमाणे:**

मौजे वायगाव, ता.उदगीर, जि.लातूर येथील जमीन सर्वे नं./गट नं.१४० मधील एकूण जमीन ०१हे ७२आर जिचा आकार ०२रू.२५पैसे असून खाते क्र.८०६ आहे. वादी व प्रतिवादी हे आपसात पती पत्नी असून त्यांचे लग्न इ.स.२००४ मध्ये मौजे कोनाळी(ना.), ता.देवणी, जि.लातूर येथे वादीच्या आई वडीलांनी मुस्लीमधर्माच्या रितीरिवाजाप्रमाणे करून दिले होत. त्यांना दोन अपत्य नामे नेहा व समीर आहेत. वादीचे वडील नामे बकशुसाब शेख व मोठा भाऊ नामे शादुल शेख यांनी वादी व प्रतिवादी यांना राहण्यासाठी मौजे वायगाव येथे आठ ते दहा लाख रुपये खर्च करून घर बांधून दिलेले होते. तसेच, वादीचा मोठा भाऊ यांनी वेळोवेळी प्रतिवादीला कर्जाची परत फेड करण्यासाठी आणि दवाखाना उपचारासाठी म्हणून त्याच्या मागणीप्रमाणे वीस हजार, पन्नास हजार, एक लाख असे करून आजपर्यंत एकूण रक्कम आठ लाख रुपये दिलेले आहे. सदरील रक्कम प्रतिवादी यांनी आजतागायत वादीच्या भावाला परत दिलेली नाही.

३. वादीने पुढे असे कथन केले आहे की, दावा मिळकत ही

प्रतिवादी यांची जमीन होती. वादी व प्रतिवादी हे आपसात पती पत्नी असल्यामुळे आणि प्रतिवादीने प्रेमापोटी वरील दावा मिळकत ही सन २०१७ मध्ये रमजान ईद रोजी वादीला साक्षीदार शादुल बकशुसाब शेख, हुसेनसाब महेबूबसाब शेख, राम गोविंदराव बिरादार, अंकुश शिवाजी व राम दादाराव बिरादार व इतर नातेवाईक आणि मित्रांच्या समक्ष तोंडी हिबा करून ताबा दिला होता. सन २०१७ पासून वादी सदर मिळकतीवर मालकी नात्याने काबीज आहे. प्रतिवादी हा इतर नातेवाईकांच्या व मित्रांच्या सांगण्यावरून वादीच्या दावा मिळकतीत शांततामय ताब्यात अडथळा व हस्तांतरण करण्याच्या प्रयत्नात आहे. दि.२५/०३/२०२३ रोजी प्रतिवादीने दावा मिळकत त्यांच्या नावे असल्याचा गैरफायदा घेऊन दावा मिळकतीत येऊन सदरील मिळकत विक्री करणार आहे म्हणून वादीला चेतावणी व धमकी दिली. म्हणून, वादी यांनी सदरचा तुर्तातुर्त मनाई हुकूमाचा अर्ज दाखल केला आहे.

४. सदर दाव्यात प्रतिवादी यांना वारंवार संधी देऊन देखील त्यांनी त्यांचे म्हणणे सादर न केल्याने त्यांच्याविरुद्ध विनाकैफियात आदेश दि.१६/१०/२०२३ रोजी करण्यात आला.

५. सदर अर्जातील कथनांच्या अवलोकनावरून खालील मुद्दे माझ्या विचारार्थ उपस्थित झाले आहे. त्यांचे निष्कर्ष मी कारणमिमांसासहीत खालीलप्रमाणे नोंदवित आहेः–

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १ | वादीने प्रथमदर्शनी केस सिध्द केली आहे काय? | ..नकारार्थी |

| | | |
|---|---|---|
| २ | वादीने अनुकूलतेचा कल त्याच्या बाजूने असल्याचे सिध्द केले आहे काय ? | ..नकारार्थी |
| ३ | वादींना तुर्तातुर्त मनाई हुकूम नाकारल्यास त्याचे अपरिमित नुकसान होणार असल्याचे वादीने सिध्द केले आहे काय ? | ..नकारार्थी |
| ४ | काय आदेश ? | अर्ज नामंजूर करण्यात येतो. |

## कारणमिमांसा

**मुद्दा क्र.१ ते ३ करिता:–**

**६.** मुद्या क्र. १ ते ३ एकमेकांशी संलग्न असल्याने पुनरावृत्ती टाळणेसाठी ते एकत्रितरित्या विचारात घेतले आहेत.

७. सदरचा अर्ज हा तुर्तातुर्त ताकीदीचा असल्यामूळे प्रकरणाच्या गुणदोषावर विस्तृतपणे उहापोह करणे जरुरी नाही. तुर्तातुर्त ताकीदीचा अर्ज विचारात घेत असताना प्रथमदर्शनी केस कोणाच्या बाजूने आहे व अर्ज नामंजूर केलेस कोणाचे मोठ्या प्रमाणावर नुकसान होईल इतकी मर्यादीत बाब विचारात घेणे जरुरीचे असते.

८. वादी यांनी त्यांच्या कथनांच्या पुष्ठ्यर्थ फेरीस्त नि.क्र.४/१ वर दावा मिळकतीचा गाव नमुना ८अ चा उतारा दाखल केला आहे. त्याच्या अवलोकनावरून असे दिसून येत आहे की, खाते क्र.६०८ प्रतिवादी रमजान रशीदसाब सय्यद यांच्या नावाने नोंद आहे. तसेच वादी यांनी

फेरीस्त नि.क्र.४/२ वर गट क्र.१४० चा ७/१२ उतारा दाखल केला आहे. त्याच्या अवलोकनावरून असे दिसून येते की, गट क्र.१४० मध्ये १हे. ७२आर जमीन प्रतिवादी यांच्या नावाने नोंद आहे. सर्वप्रथम येथे महत्वाची बाब अशी आहे की, वादी यांच्या कथनानुसार दावा मिळकत सन २०१७ साली प्रतिवादी यांनी तोंडी हिब्बाद्वारे साक्षीदारांसमक्ष वादी यांना दिलेली आहे. तेव्हा पासून वादी हे दावा मिळकतीच्या कब्जेवहिवाटीस आहेत. जर प्रतिवादी यांनी तोंडी हिब्बाद्वारे वादी यांना दावा मिळकती सन २०१७ साली दिली होती तर आजतागायत दावा मिळकत ही प्रतिवादी यांच्या नावाने का नमुद आहे याचे कारण वादी यांनी त्यांच्या अर्जात कोठेही नमूद केले नाही. तसेच, वादी यांनी दावा मिळकत ही त्यांच्या नावाने नोंद करून घेण्याबाबतची कोणतीही कार्यवाही देखील केली नसल्याचे दिसून येते.

९. तुर्तातुर्त ताकीदीच्या अर्जावर विचार करतेवेळी सर्वोप्रथम दावा मिळकतीच्या कब्जेवहिवाटीस कोण आहे ही बाब लक्षात घेणे जरुरीचे आहे. या प्रकरणात जरी वादी ही दावा मिळकतीच्या कब्जेवहिवाटीस असल्याबाबचे कथन करते तरी तिने त्याबाबत कोणताही कागदोपत्री पुरावा या प्रकरणात दाखल केला नाही. तसेच, वादी यांनी दाखल केलेल्या कागदपत्रावर प्रतिवादी यांच्या नावाची नोंद असल्याचे स्पष्टपणे दिसून येते. सध्या वादी ही दावा मिळकतीच्या कब्जेवहिवाटीस नाही ही बाब वादी यांनी दाखल केलेल्या कागदपत्राधारे प्रथमदर्शनी दिसून येते. म्हणून वादी यांनी त्यांची केस प्रथमदर्शनी शाबीत केली नसल्याने व अनुकूलतेचा कल वादीच्या बाजूस नसल्याने वादी तुर्तातुर्त ताकीद मिळण्यास पात्र नाही. तसेच, जर वादी यांना तुर्तातुर्त ताकीद दिली नाही तर वादी यांचे कोणतेही नुकसान होणार नाही. सबब, मुद्या क्र.१ ते ३ चे उत्तर नकारार्थी देवून मुद्या क्र.४ करीता खालील आदेश पारीत करीत आहेः–

## आदेश

वादीचा **नि.५** कडील अर्ज नामंजूर करण्यात येते.

(आदेश खुल्या न्यायालयात सही करुन घोषित केला)

**उदगीर** **(श्रीमती जे.सी.गुप्ता)**

**दिनांक: ०७/१२/२०२३** **सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर)**

**उदगीर.**